# विद्यापीठाच्या 'कॅम्पस'मधून ४२ जणांना संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील ४२ विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय पातळीवरील विविध अकरा कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी मिळाली आहे. त्यांना वेतनापोटी पावणे दोन लाख ते सात लाख रुपयापर्यंतचे पॅकेज मिळाले आहे.

या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये २०१९-२०२० मध्ये विविध उद्योग संस्था कॅम्पस् ड्राइव्ह घेतला. त्यातून निवड झालेल्यांत केशव शिंदे, प्रसाद चौधरी, हर्षवर्धन पाटील, वृषाली सावंत, निखिल पत्रावळे, प्रेरणा राजपूत, अमोल देवकाते, वैभव पाटील, ललित ढाणे, ओंकार कोष्टी, ऋषिकेश नलवडे, वेदांत दाविले, अंकिता श्रींगारे, ऐश्वर्या चव्हाण, सिध्दांत खर्डेकर, वेद इंगलेश्वर, नीलेश हलगे, विश्वजित घाटगे, वैभव गुंजाटे, सुरज मस्के, अनिकेत भोसले, शुभम हावळे, सदानंद जाधव, सुरेश कुमार राय, सूचिता तोरानेवाले, शंतनू बलसे, अंगद चोपडे, सौरभ घाटगे, शिवम चंगोत्रा, शिल्पा बोंबले, अखिल सलगोत्रा, आकाश भोसले, श्रुती लटे, कल्याणी पवार, पोरस जाधव, राजवर्धन कुलकर्णी, शुभम कुलकर्णी, संजय गावडे यांचा समावेश आहे. त्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांचे मार्गदर्शन लाभले.

## शाखानिहाय निवडलेले विद्यार्थी

| | |
|---|---|
| इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग | ६ |
| मेकॅनिकल इंजिनिअरिंग | ५ |
| कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी | २२ |
| फूड टेक्नॉलॉजी | ४ |
| केमिकल इंजिनिअरिंग | ५ |



विद्यार्थ्यांना औदयोगिक क्षेत्राची ओळख करून देऊन त्यांचा वैयक्तिक विकास घडविणे, त्यांना करिअर निवडण्याचे पूर्वज्ञान मिळावे, यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून करिअर विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तंत्रज्ञान अधिविभाग औदयोगिक ज्ञान, संशोधनामध्ये उत्कृष्ट गुणवत्तेचे केंद्र बनावे, यासाठी आम्ही कार्यरत आहोत.

- **डॉ. जयदीप बागी**, संचालक, तंत्रज्ञान अधिविभाग

# विद्यापीठात राजमाता जिजाऊ, विवेकानंद यांची जयंती साजरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर.के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात पुनर्परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिल्लक जागेसाठी पुनर्परीक्षा मंगळवारी घेण्यात आली. या परीक्षेला २१६ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला होता. त्यापैकी १७७ विद्यार्थी उपस्थित होते. ही परीक्षा एम. टेक, एम. लिप., मास्टर ऑफ जर्नालिझम, एम. एस. डब्ल्यू, बी. लिप., एम. एस्सी कॉम्प्युटर सायन्स, एम. एस्सी बायो केमेस्ट्री, एम. एस्सी बायो टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, बी. एस्सी, एम. एस्सी, नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी, एम. एस्सी. नॅनो टेक्नॉलॉजी, एमबीए रूरल मॅनेजमेंट, एम.ए. मास कम्युनिकेशन या विषयांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

# शिवाजी विद्यापीठात वि. स. खांडेकर जयंती

प्रतिनिधी
कोल्हापूर

वि. स. खांडेकरांचे साहित्य कोरोना काळात नैराश्येतून बाहेर काढण्यासाठी उपयुक्त ठरले आहे. जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन त्यांच्या लेखांतून दिसून येतो. 'क्रौंचवध', 'कांचनमृग' आणि 'ययाती' या त्यांच्या कादंबऱ्यांमधून मानवी जीवनाच्या संघर्षवरती भाष्य केले आहे. या साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी विद्यापीठ कटीबद्ध आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठाचे पहिले परितोषिक मिळवून देणारे साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे झालेल्या कार्यक्रम ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ललितबंध सारांशरूपाने खांडेकर साहित्यबद्दलची माहिती विद्यापीठयांच्या ई मिडियावरून प्रसिध्द केली जाईल. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस पाटील म्हणाले, वि. स. खांडेकरांचे साहित्य युवापिढीपर्यंत मोबाईल ॲप तसेच अन्य साधनाव्दारे पोचवण्यात येईल. यावेळी वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.

# विवेकानंद संस्थेचा डिसले यांना पुरस्कार

## प्राचार्य गावडे यांची घोषणा; रविवारी होणार प्रदान

**सकाळ वृत्तसेवा**



**रणजितसिंह डिसले**

कोल्हापूर, ता. १३ : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आदर्श शिक्षक पुरस्कार ग्लोबल टीचर अ‍ॅवॉर्ड पुरस्कार विजेते रणजितसिंह डिसले यांना देण्यात येणार आहे. रविवारी (ता. १७) सकाळी दहाला डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे हा समारंभ होईल. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर प्रमुख पाहुणे असणार आहेत. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती संस्थेच्या सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

गावडे म्हणाल्या, की संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळोखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षापासून १७ जानेवारी हा विवेकानंद सप्ताहातील दिवस 'ज्ञानशिदोरी दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरविले आहे. त्याचे औचित्य साधून 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आदर्श शिक्षक पुरस्कार २०२१' दिला जाईल. ग्लोबल टीचर्स अ‍ॅवॉर्ड मिळविलेले जिल्हा परिषदेचे शिक्षक रणजितसिंह डिसले यांना पुरस्काराने गौरविण्यात येईल. शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

या वेळी 'समर्पित गुरुदेव : प्राचार्य अभयकुमार साळुंखे', 'पुत्र अमृताचा व गंध चंदनाचा' या ग्रंथांचे प्रकाशन होणार आहे. त्याबरोबर शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे दिनदर्शिका प्रकाशन करण्यात येईल. या पत्रकार परिषदेला प्राचार्य डॉ. युवराज भोसले, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार उपस्थित होते.